# माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या शुभहस्ते पंतप्रधान शेतकरी सन्मान निधीचा १९ वा हप्ता वाटपाचे ऑनलाइन लाईव्ह प्रसारण

भारतीय कृषि अनुसंधान परिषद – जेएनआयईएसटीआर ट्रस्ट नांदेड संचालित कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड-१ तर्फे माननीय पंतप्रधान नरेंद्रजी साहेब यांच्या शुभहस्ते पंतप्रधान शेतकरी सन्मान निधीचा १९ वा हप्ता वाटपाचे ऑनलाइन लाईव्ह प्रसारण करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटनस्थानी प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड-उत्तरचे लोकप्रिय आमदार श्री.बालाजीराव कल्याणकर, नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री.राहुल कर्डिले साहेब, नांदेड जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. दत्तकुमार कळसाईत साहेब उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एस.डी.मोरे संचालक, कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेड व डॉ.देविकांत देशमुख वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख आयोजक होते. याप्रसंगी शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद व जिल्ह्यातील प्रयोगशील व प्रगतीशील शेतकरी बांधव व बघिनींचा शाल, पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी सत्कारमूर्ती शेतकरी बांधवांनी कृषि विज्ञान केंद्र आणि कृषि विभागाच्या विविध योजना व प्रशिक्षणे यावरील आपले अनुभव आणि निरीक्षणे व त्यांना झालेला प्रत्यक्ष फायदा मनोगताद्वारे उपस्थित शेतकरी बांधवापुढे व्यक्त केला.

नांदेड-उत्तर विधानसभेचे आमदार श्री बालाजीराव कल्याणकर यांनी त्याच्या भाषणातून शेतक-यांनी कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेडचे तंत्रज्ञान आपल्या शेतीसाठी महत्वाचे आहे आणि त्याचा फायदा शेतक-यांनी घेतला पाहिजे असा विश्वास व्यक्त केला. कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी नांदेडचे कार्य हे दुर्गम डोंगराळ भागात विस्तारले असून नांदेड जिल्ह्यातील सर्वच स्तरातील शेतक-यांपर्यंत आद्यवत कृषि तंत्रज्ञान, कृषि सल्ला व मार्गदर्शन प्रशिक्षणे व इतर कृषि विस्तार कार्यक्रमातून पोहचविण्यात हे कृषि विज्ञान केंद्र अग्रेसर असून त्यांचे विस्तारकार्य कौतुकास्पद आहे, असे गौरव उद्गार काढले.











सुस्वागतम


सुस्वागतम


सुस्वागतम




ICAR New Delhi, ATARI Pune & JNIESTR Nanded's
Krishi Vigyan Kendra
Pokharni, Nanded-1 (Ms)
कृषि विज्ञान केंद्र
पोखर्णी,नांदेड-१(महा)